**पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड**
**शंकरशेठ रोड, स्वारगेट,**
**पुणे ४११ ०३७.**

**'अ' पाकीट**

**टेंडर क्र. २३/२०१७-१८**

**टेंडर फॉर्म / गोषवारा**

| | | |
|---|---|---|
| निविदा भरणाऱ्याचे नाव | : | ........................................................................................................ |
| पत्ता | : | ........................................................................................................ |
| | | ........................................................................................................ |
| निविदेमधील कामाचे नाव | : | महामंडळाच्या १३ आगारांकडे स्वयंचलित वॉशिंग मशीन (Imported दोन ब्रशसहीत) चा पुरवठा करून उभारणी करणे. |
| निविदा र. रू. | : | ८५,००,०००/- |
| निविदा फॉर्मची किंमत र. रू. | : | ५,४२१/- (विना परतावा) |
| निविदा बयाणा र. रू. | : | १,००,०००/- |
| सदरची निविदा | : | फक्त मान्यताप्राप्त उत्पादन कंपनी अथवा उत्पादन कंपनीचे अधिकृत विक्रेते तसेच टेंडर अटी-शर्तीमध्ये नमूदप्रमाणे कामचा अनुभव असणाऱ्या फर्मना भरता येईल. |

सूक्ष्म व लघु, मध्यम उद्योग विकास अधिनियम २००६ अंतर्गत उत्पादक म्हणून नोंदणीकृत असलेल्या सुक्ष्म व लघु उत्पादक उद्योगांना व मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना यांचेकडे नोंदणी झालेल्या उत्पादक पुरवठादारांना निविदा शुल्क व बयाणा रक्कम भरण्यापासून सूट देण्यात आली आहे.

सदर कामांबाबत निविदा अटी-शर्तीबाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच www.maharashtra.etenders.in, www.pmpml.org, www.pmctenders.abcprocure.com व www.punecorporation.org या वेबसाईटवर उपलब्ध आहेत.

www.pmctenders.abcprocure.com व www.punecorporation.org या वेबसाईटवरून निविदा संचाची विक्री व स्विकृती फक्त ऑनलाईन पध्द्तीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकीट पध्द्तीने ऑनलाईन मागविण्यात येत आहे. टेंडरसंबंधीच्या अटी-शर्ती व इतर तपशील सोबत जोडल्याप्रमाणे आहे.

**मुख्य अभियंता**
**पीएमपीएमएल**

**पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड**
**'अ' पाकीट**
**टेंडर क्र. २३/२०१७-१८**

**'अ' पाकीटामध्ये खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.**

१) फक्त मान्यताप्राप्त उत्पादक कंपनी / उत्पादन कंपनीचे अधिकृत विक्रेते असलेबाबतची कागदपत्रे.
२) कामाचे स्वरूपास अनुसरून मुंबई दुकान व संस्था नियम वैद्य दाखला (चालू नूतनीकरणासह), शॉप ॲक्ट लायसन्सवर टेंडरमध्ये नमूद कामाची आवश्यक राहील.
३) मागील ३ वर्षांचे आयकर, व्हॅट टॅक्स, सर्व्हीस टॅक्सचा भरणा केल्याचे प्रमाणपत्र, पॅनकार्डच्या झेरॉक्स प्रती सादर करणे.
४) शासकीय व निमशासकीय संस्थेमध्ये यापुर्वी अशा स्वरूपाचे कामकाज केलेल्याबाबत अनुभवाचा दाखला.
५) निविदा बयाणा रक्कम ई-टेंडर सेल, पुणे मनपा येथे ऑनलाईन स्वरूपात भरल्याची पावती जमा करणे.
६) लिस्ट ऑफ मशिनरी, मालक/संचालकांची यादी.
७) वार्षिक उलाधालीचा चार्टर्ड अकाऊंटचा दाखला.
८) इन्शुरन्स, प्रोव्हीडंट फंड, ईएसआय रजिस्ट्रेशन, कामगारांचा गत २ वर्षीचा प्रोव्हीडंट फंड शासनाकडे जमा केल्याच्या पावत्या.

'ब' पाकीटामध्ये खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.
निविदा दर 'ब' पाकीटामध्येच भरावेत.

टिप : १) याप्रमाणे 'अ' पाकीटामध्ये कागदपत्रे सादर केली असतील तरच निविदा दराचे 'ब' पाकीट उघडण्यात येईल.
२) महामंडळाकडील गठीत समितीमार्फत कंपनीच्या पत्त्यावर फक्टरी इन्स्पेक्शन करण्यात येइर्ल. तद्नंतर मशिनरी योग्य असल्याची खात्री झाल्यानंतर 'ब' पाकीट उघडण्यात येईल.
अथवा
३) निविदा धारकाने ऑनलाईन निविदा भरताना स्कॅन करून 'अ' पाकीट सदराखाली पाठविलेली कागदपत्रे निविदा उघडीलेनंतर मूळ कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती प्रमाणित (अटेस्टेड) तसेच मूळ एफडीआर महामंडळाच्या कार्यालयात सादर करावे.

**पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड**
**'ब' पाकीट**

**टेंडर क्र. २३/२०१७-१८**
**निविदा बयाणा र. रू.१,००,०००/-**

**मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक,**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड,**
**शंकरशेठ रोड, स्वारगेट, पुणे ४११ ०३७.**

**यांजकडेस सविनय सादर...**

मी/आम्ही खाली स्वाक्षरी/स्वाक्षऱ्या करणार यांनी पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड यांचे १३ आगारांकडे स्वयंचलित वॉशिंग मशीन (Imported दोन ब्रशसहीत) चा पुरवठा करून उभारणी करणे या कामकाजाकरीता असलेल्या निविदेच्या अटी-शर्ती वाचून पाहिल्या आहेत. सदरच्या सर्व अटी-शर्ती मला/आम्हांस मान्य असून त्यानुसार मी/आम्ही ही निविदा देत आहे/आहोत. सदरच्या सर्व अटी-शर्ती मला/आम्हांस कबूल असल्याबदद्ल मी/आम्ही स्वाक्षरी/स्वाक्षऱ्या केली आहे/केल्या आहेत व त्याप्रमाणे स्वाक्षरी केलेल्या अटी-शर्ती सोबत जोडलेल्या आहेत.

मी/आम्ही पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड करीता १३ आगारांकडे खाली नमूद स्वयंचलित वॉशिंग मशीन (दोन ब्रशसहीत) चा पुरवठा करून उभारणी करणेचे कामकाज करण्यास तयार आहे/आहोत.

**महामंडळाच्या विविध आगारांकडे स्वयंचलित वॉशिंग मशीन (**Imported **दोन ब्रशसहीत) चा पुरवठा करून उभारणी करणे, स्पेसिफिकेशननुसार दर देणे.**

| तपशील | नग | बेसिक दर | टॅक्सेस | अंतिम दर |
|---|---|---|---|---|
| स्वयंचलित वॉशिंग मशीन (दोन ब्रशसहीत) चा पुरवठा करून उभारणी करणे. | १ | | | |

१. टेकनिकल स्पेसिफिकेशन.

| | | |
|---|---|---|
| Type of Machine | : | 2 brush roll over gantry type |
| Washing Height | : | 3385 mm |
| Machine Height | : | 4190 mm is based on 3385 mm washing capacity. Add 300mm for each increase in washing capacity upto maximum of 4572 mm. |
| Machine Width | : | 4115 mm |
| Machine Length | : | 1770 mm |
| Electric Supply | : | 380/440 V, 3 Phase 50 cycle with Neutral. |
| Power Required | : | 6 kW |
| Time of Wash Cycle | : | 6 Minutes |
| Starting Method | : | Push button/vehicle actuated. |
| Shampoo/ detergent | : | Automatic by Electronic Metering Pump. |
| Water Pressure | : | 4 bar |
| Water Consumption | : | 182-410 litres depending on size of vehicles. |
| Brushes | : | The brushes are imported and are to be International standards, 900mm dia Horizontal & 100 mm dia Vertical Brushes in 305 mm long, 'X' section profile polyethylene brushes. The brush shall be guaranteed for minimum of 50,000 wash cycles. |
| Motor warranty | : | Motor warranty must be for 2 years |

२. उपरोक्तप्रमाणे सर्व करांसहीत, सर्व अटी-शर्तीस अधिन राहून दर देणे. तसेच भविष्यातील सर्व लागू होणाऱ्या करांचा समावेश दरात राहील. यामध्ये वाढ होणार नाही.

३. मशीनचा पुरवठा खरेदी आदेशाप्रमाणे महामंडळाच्या विविध आगारांकडे करावयाचा आहे.

४. एलबीटीसंबंधी कागदपत्रांची पूर्तता करण्याबाबत संपूर्ण जबाबदारी निविदाधारकाची राहील.

वरीलप्रमाणे निविदा मी पुर्णपणे वाचली असून मला सादर करण्यात आलेले वरील विषयाची कागदपत्रे व इतर सर्व मान्य अटी व शर्ती संबंधित बस दुरूस्तीच्या/मटेरीयल/ऑटोमेटीक वॉशिंग पुरवठयाच्या कामासंदर्भात मला मिळालेल्या निविदा पत्रानुसार मला मान्य असल्याने सही करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| निविदा भरणाऱ्याचे नाव व पत्ता | : | ........................................................................................... |
| | | ........................................................................................... |
| | | ........................................................................................... |
| व्हॅट/पॅन/टॅन/सेल्स टॅक्स नं. | : | ........................................................................................... |
| फोन नंबर | : | ........................................................................................... |
| मोबाईल नंबर | : | ........................................................................................... |
| रजिस्ट्रेशन/शॉपअॅक्ट/ स्मॉलस्केल/इंड. चालू नोंदणी क्र. | : | ........................................................................................... |
| ई-मेल आयडी | : | ........................................................................................... |

**निविदाधारकाची स्वाक्षरी**
**रबरी स्टॅम्प**

**पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड**
**'अ' पाकीट**
**टेंडर क्र. २३/२०१७-१८**
**'' ठेकेदाराचे प्रतिज्ञापत्र ''**

पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेडकडील १३ आगारांकडे स्वयंचलित वॉशिंग मशीन (Imported दोन ब्रशसहीत) चा पुरवठा करून उभारणी करणेकरीता निविदा मी/आम्ही ऑनलाईन सादर केलेले आहे. निविदा अटी-शर्ती प्रमाणे 'अ' पाकीटामध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांची पूर्तता मी/आम्ही केलेली आहे. सदरची कागदपत्रे ही सत्य आहेत.

याप्रतिज्ञापत्राव्दारे मी/आम्ही आमचे कुटुंबीय/नातेवाईक पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड मध्ये नोकरीस आहेत/नाहीत. याबातची माहिती खालीलप्रमाणे.

निविदाधारकाशी संबंधित पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड मध्ये असलेल्या व्यक्तीचे नाव -

......................................................................................................................................................

हुद्दा : ...................................................................................................................................

निविदाधारकाशी नाते : ........................................................................................................

सदर माहिती खोटी आढळल्यास टेंडरच्या कोणत्याही टप्प्यावर माझ्यावर कायदेशीर कारवाई करणेस माझी काहीही हरकत नाही.

**निविदाधारकाची स्वाक्षरी**

निविदाधारकाचे नाव : .........................................................

निविदाधारकाचा संपूर्ण पत्ता : ...............................................

.............................................................................................

.............................................................................................

टिप : सदरचे प्रतिज्ञापत्र ठेकेदाराने रू. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर तयार करून निविदेसोबत सादर करावयाचे आहे.

**पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड**
**'अ' पाकीट**
**टेंडर क्र. २३/२०१७-१८**

**" महामंडळाच्या १३ आगारांकडे स्वयंचलित वॉशिंग मशीन (Imported दोन ब्रशसहीत) चा पुरवठा करून उभारणी करणे"**

**<u>अटी – शर्ती</u> :-**

१. पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड, पुणे यांचेकडून महामंडळाच्या विविध आगारांकडे स्वयंचलित वॉशिंग मशीन (दोन ब्रशसहीत) चा पुरवठा करून उभारणी करणेकामी निविदा मागविण्यात येत आहे. निविदाधारकाने त्यांचे संबंधित गतवर्षाच्या कामाबाबतच्या अनुभव कार्यक्षमतेच्या दाखल्याची स्कॅन कॉपी सादर करणे बंधनकारक आहे.

२. सदर कामाची निविदा www.pmctenders.abcprocure.com व www.punecorporation.org या वेबसाईटवर दि.०५/०६/२०१७ रोजी दु. २.३० वा. पर्यंत भरता येईल. सदर वेळेनंतर आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही किंवा निविदा भरता येणार नाही.

३. निविदा बयाणा रक्कम ई-टेंडर सेल येथे ऑनलाईन स्वरूपात भरल्याची पावती जाम करावयाची आहे. सदरची पावती टेंडर कागदपत्रासोबत 'अ' पाकीटमध्ये देणे बंधनकारक आहे.

४. निविदेमध्ये दर सादर करताना सर्व करांसहीत (एलबीटी, सर्व्हीस टॅक्स, व्हॅट, सेल्स टॅक्स इ.) देण्यात यावेत. दिलेल्या दरामध्ये महामंडळाच्या विविध आगारांकडे स्वयंचलित वॉशिंग मशीन (तीन ब्रशसहीत) चा पुरवठा करून उभारणी करावयाची आहे.

५. निविदेन्वये वर्कऑर्डर दिल्यानंतर ३० दिवसांचे मशिनरींची उभारणी करून प्रत्यक्ष कामकाज सुरू होणे आवश्यक आहे.

६. मशिनरींची उभारणी ३० दिवसांत पूर्ण होवून प्रत्यक्ष कामकाज सुरू न झाल्यास प्रतिदिन र.रू. १,०००/- इतका दंड आकारण्यात येईल.

७. सदर मशिनरी खरेदीचे आदेश दिल्यानंतर ३० दिवसांत मशिनरींची उभारणी न केल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता सुरक्षा अनामत रक्कमेतून दंडात्मक रक्कम जप्त करण्याचा अधिकार परिवहन महामंडळाने राखून ठेवलेला आहे. याबाबत कोणतेही कारण देण्यास महामंडळ जबाबदार राहणार नाही.

८. कामकाज सुरू झालेनंतर वॉरंटी कालावधीत मशिनरीमध्ये काही तांत्रिक बिघाड झाल्यास १ दिवसांत (२४ तास) सदर मशिनरी दुरूस्त होणे आवश्यक आहे. १ दिवसांत मशिनरी दुरूस्त न झाल्यास प्रतिदिन र.रू. ५००/- इतका दंड आकारण्यात येईल. सदरचा दंड देय बिलातून अगर सुरक्षा अनामत रक्कमेतून वसूल करण्याचा अधिकार महामंडळास राहील.

९. निविदा स्विकारणे किंवा नाकारणेचा अधिकार मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, पीएमपीएमएल यांना राहतील. याबाबत कोणतेही कारण देणे महामंडळावर बंधनकारक नाही.

१०. मंजूर निविदाधारकास सुरक्षा अनामत रक्कमेपोटी कामाचे निविदेचे ३ टक्के रक्कम भरावी लागेल.

११. मान्यताप्राप्त निविदाधारकास महामंडळाकडे योग्य त्या रक्कमेचे स्टॅम्प पेपर करारनामा करणेकरीता (स्टॅम्प ॲक्टनुसार) निविदाधारकाने देणे बंधनकारक आहे. सदर करारनाम्यास येणाऱ्या खर्चास

मान्यताप्राप्त निविदाधारकाने नकार दिल्यास मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, पीएमपीएमएल यांना सदर मान्यता नाकारण्याचा अधिकार राहील.

१२. निविदेन्वये घेण्यात येणाऱ्या मशिनरीच्या वॉरंटी कालावधी परिवहन महामंडळाकडे मशिनरी बसविलेच्या दिनांकापासून सुरू होईल. सदर मशिनरीचा वॉरंटी कालावधी १५ महिने इतका राहील.

१३. महामंडळाच्या बसेसचे वॉशिंग कामकाजाकरीता आवश्यक मशिनरींचा पुरवठा करून महामंडळाकडील सेवकांना या मशिनरी हाताळणीचे प्रशिक्षण संबंधित निविदाधारकाने देणे बंधनकारक राहील. तसेच वेळोवेळी महामंडळास आवश्यक ते सहकार्य करण्याची जबाबदारी संबंधित निविदाधारकाची राहील

१४. बयाणा रक्कम / सिक्युरीटी डिपॉझिटवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही. सदर एफडीआर मशीनचा वारंटी कालावधी संपलेनंतर परत करण्यात येईल.

१५. निविदाधारकाने सदर मशीनचे उत्पादक / उत्पादक कंपनीचे अधिकृत डिलर असलेबाबतची माहिती निविदेसोबत दयावी.

१६. सदर वर्कऑर्डरचे कामे दर्जेदार व वेळेत करणेची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

१७. खरेदी आदेश, कामाबाबतच्या सूचना मुख्य अभियंता यांचेकडून देण्यात येतील. निविदाधारकाने योग्यप्रकारे काम न केल्यास अथवा नाकारल्यास सदरचे काम इतर मार्गाने करून घेण्याचे अधिकार मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, पीएमपीएमएल यांना राहतील. याबाबतचे बिल, जादा खर्च संबंधित निविदाधाकारकडून वसूल करण्यात येईल. त्याचबरोबर त्यांची सुरक्षा अनामत रक्कम कोणतेही कारण न देता जप्त करण्यात येईल.

१८. वर्कऑर्डरचे काम निकृष्ट दर्जाचे आढळल्यास किंवा काही ठरवून दिलेल्या मुदतीत काम न केल्यास निविदा रद्द करण्याचा अधिकार मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना राहील. त्याचबरोबर करारनामा रद्द करून याबाबतची जादा खर्च भरवाई आपले बिलातून अगर डिपॉझिट रकमेतून वसूल करण्यात येईल.

१९. वॉशिंग मशिनची उभारणी कामकाज करताना महामंडळाचे मालमत्तचे काही नुकसान झाल्यास संबंधित निविदाधारकांस जबाबदार धरून नुकसान भरपाई वसूल करण्यात येईल. याबाबत मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्याकडे अंतिम निर्णय होईल व तो संबंधित निविदाधारकावर बंधनकारक राहील.

२०. काम पूर्ण झालेनंतर मुख्य अभियंता किंवा त्यांचे प्रतिनिधी सदरच्या कामाची तपासणी करतील. कामाचा दाखला देताना मुख्य अभियंता यांचे दृष्टीने काम समाधानकारक झाल्यास निविदाधारकांना कोणताही जादा खर्चाची तोषिस लागणार नाही

२१. निविदाधारकामध्ये जर टेंडरबाबतच्या अटी-शर्तीवरून वादाचा प्रसंग निर्माण झाल्यास त्यावर निर्णय घेण्याचे अंतिक अधिकार मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना राहील व त्यांचा निर्णय अंतिम समजण्यात यावा.

२२. निविदाधारक अटी-शर्तीप्रमाणे काम करत नसल्याचे मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना आढळून आल्यास योग्य ती दंडात्मक कारवाई करतील त्यावर कोणतेही अपिल करता येणार नाही.

२३. सदर नमूद अटी-शर्ती या निविदाधारकास मान्य असल्यानेच तो सदरचा टेंडर फॉर्म स्वाक्षरी/सूचनासह (स्पेस सोडल्यास) सादर केला आहे वा त्यांना मान्य राहील असे महामंडळ मानते.

२४. इतर शासकीय/निमशासकीय संस्थांमध्ये काम केलेच्या दाखल्याची, पुराव्याची स्कॅन कॉपी निविदेसोबत सादर करणे बंधनकारक आहे.

२५. निविदाधारकाने दिलेल्या कोटेशनमधील कमीतकमी दराने काम करीत असताना त्याने इतरत्र काम करताना महामंडळाला दिलेल्या दरापेक्षा कमी दराने काम केल्याचे महामंडळाला आढळल्यास यावर त्या कमी दराने काम केल्याबाबत निविदाधारकावर कारवाई करणेचा महामंडळास अधिकार आहे याची नोंद घ्यावी.

२६. बिल अदायगी कालावधी :-

| | |
|---|---|
| १) महामंडळाकडे मशिनरी प्राप्त होवून प्रत्यक्ष कामकाजास सुरूवात झालेनंतर | : ७५ टक्के |
| २) वॉरंटी कालावधी (१५ महिने) पूर्ण झालेनंतर | : २५ टक्के |

२७. निविदेमध्ये कमीतकमी दर दिलेले आहेत म्हणजे निविदा मंजूर होईल असे नाही. सदर काम व दराबाबत छाननी केली जाईल.

२८. सदर कामांचे निविदा संच www.maharashtra.etenders.in, www.pmpml.org, www.pmctenders.abcprocure.com व www.punecorporation.org या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

२९. www.pmctenders.abcprocure.com व www.punecorporation.org या वेबसाईटवरून निविदा संचाची विक्री व स्विकृती फक्त ऑनलाईन पध्दतीने करण्यात येत असून निविदा फॉर्म निर्धारीत किंमत अधिक व्हॅट क्रेडीटकार्ड अथवा नेटबँकींगद्वारे ऑनलाईन भरून दि.२६/०५/२०१७ रोजी स. १०.३० पासून ते दि.०३/०६/२०१७ अखेर दु. २.३० वाजेपर्यंत खरेदी करून शकतील. या निविदासंबंधी प्रि-बिड मिटींग मुख्य अभियंता कार्यालय, स्वारगेट, पुणे येथे दि.३१/०५/२०१७ रोजी दु. ४.०० वा. होईल. ऑनलाईन निविदा वरील नमूद वेबसाईटवर दि.२६/०५/२०१७ ते दि.०५/०६/२०१७ या कालावधीत पाठवू शकतील. निविदा द्यावयाच्या अंतिम दिवशी दु. २.३० वाजेपर्यंत निविदा स्विकारल्या जातील. तांत्रिक निविदा दि.०६/०६/२०१७ रोजी दु. ४.०० वा. उघडण्यात येतील.

**मुख्य अभियंता**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

---

सदरहू शर्ती वाचून मी पूर्णपणे समजावून घेतल्या आहेत व त्या सर्व मला कबूल आहेत. मागाहून गैरसमज झाला वैगरे कोणतीही तक्रार मी करणार नाही.

**निविदाधारकाची स्वाक्षरी**

**पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड**

**'अ' पाकीट**

**टेंडर क्र. २३/२०१७-१८**

**निविदाधारकांसाठी आचारसंहिता**

१. निविदा सादर करणेपूर्वी अन्य निविदाधारकांसमवेत तडजोड करून अथवा अन्य निविदाधारकांना दमदाटी करून त्यांना प्रस्तुतचे निविदा भरणेपासून परावृत्त करू नये.

२. यापूर्वी सादर केलेल्या निविदेमधील एफ.डी.आर. ही या कामासाठी ई.एम.डी. म्हणून सादर करू नये.

३. आवश्यक ती मूळ कागदपत्रे सादर करावीत अथवा मूळ कागदपत्रांच्या झेरॉक्स् प्रति खाते प्रमुखांकडून प्रमाणित करून घ्याव्यात व मगच त्या निविदा प्रकरणी समाविष्ट कराव्यात. निविदाधारकाने निविदेसोबत जोडलेल्या कागदपत्रांच्या सत्यतेबाबत काही प्रश्न निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी सर्वस्वी निविदाधारकाची राहील.

४. स्वत:चे नावावर मिळालेले काम अन्य निविदाधारकास प्रत्यक्षा करणेसाठी देऊ नये.

५. अन्य निविदाधारकाला धाक दाखवून तशी जबरदस्ती करू नये.

६. संबंधित अधिकारी तसेच अन्य निविदाधारकावर राजकीय अथवा कोणतेही दडपण आणू नये.

७. आयकर/विक्रीकर/एक्साईज/व्हॅट/कामगारांसंबंधी कायदे या संदर्भातील आवश्यक त्या कायद्यांचे कसाशीने पाल करावे. त्याची तोषिस पुणे महानगर परिवहन महामंडळाकडे राहणार नाही.

८. कामाची मुदत पूर्ण होण्यापूर्वी निविदाधारक नोंदणी दाखल्याची मुदत संपत असल्यास मुदत पूर्ण होण्यापूर्वी आवश्यक ती प्रक्रिया पूर्ण करून मुदतवाढीसाठी (नुतनीकरणासाठी) अर्ज दाखल करून नुतनीकरण करून घेणे आवश्यक आहे.

९. काम करताना संबंधित अधिकाऱ्यांच्या सुचनांचे तंतोतंत पाल करून योग्य दर्जाचे काम करून देणे आवश्यक आहे.

मी/आम्ही वरील सर्व अटी/नियम यांचे अधील राहूनच कामासाठी निविदा सादर करीत आहे/आहोत. वरील सर्व अटी माझ्यावर/आमचेवर बंधनकारक राहतील व यापैकी कोणत्याही अटीचा भंग केल्यास माझा/आमचा निविदाधारक नोंदणी दाखला रद्द होऊ शकतो याची मला /आम्हांला जाणीव आहे. तसेच या कोणत्याही अटींचा भंग होऊन पुणे महानगर परिवहन महामंडळास कोणतीही आर्थिक तोषिस लागल्यास याची सर्व जबाबदारी माझ्यावर/आमच्यावर राहील.

**निविदाधारकाची स्वाक्षरी**